SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 Email – affiliationt1@unishivaji.ac.in
FAX : ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९३२९४ व २६९२३३३.
Estd: 1962
NAAC 'A' Grade

एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/माने / 176 दिनांक 28 APR 2023

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, शारीरिक शिक्षण,
शिक्षणशास्त्र, विधि, महाविद्यालये.

**विषय:- युजीसीने संदर्भ क्रं.F.1-1/2006 (PS) Meeting दि.१९ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये नेट/सेट दोन वर्षात पुर्ण करण्याच्या अटीवर मान्यता दिलेल्या परंतु दि.०१.०१.१९९४ ते दि.११.०७.२००९ या कालावधीमध्ये एम.फिल अर्हता धारण केलेल्या व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या शिक्षकांच्या स्थाननिश्चितीच्या अनुषंगाने M.Phil धारक शिक्षकांच्या स्थाननिश्चितीसाठी विशेष शिबीर आयोजित करणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने क्रं. संकीर्ण/२२०४/प्र.क्रं९१/विशि-१/१९.११.२०२२ च्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे तसेच पुन्हा पत्र क्रं. संकीर्ण-२२०४/प्र.क्रं९१/विशि-१ दि.१६.०२.२०२३ ने कळविल्याप्रमाणे ज्या शिक्षकांची निवड समितीच्या माध्यमातून दि.१४.०६.२००६ पूर्वी नियुक्त झालेल्या व ज्यांनी सेवेत असताना, दि.०१.०१.१९९४ ते दि.११.०७.२००९ या कलावधीत एम.फील ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे, तसेच ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील अर्हतेच्या आधारे नेट मधून सुट दिलेली आहे व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे, असे अध्यापक एम.फील अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र आहेत, तसेच ज्या अध्यापकांनी दि.१४.०६.२००६ पूर्वी नियुक्तीवेळी एम.फील अर्हता धारण केली होती, अशा अध्यापकांची नियुक्ती जर विहित निवड समितीच्या माध्यमातून झाली असेल, तसेच अशा अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील अर्हतेच्या आधारे नेट परीक्षेमधून सुट देऊन त्यांच्या नावासहित तसे संबंधित विद्यापीठांना कळविलेले असेल व विद्यापीठाने नियमित स्वरुपास मान्यता दिलेली असेल, तर (१) ज्या अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना नियुक्तीपासून व (२) ज्यांनी सेवेत असताना एम. फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील असे कळविले आहे.

तथापि शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार युजीसीने संदर्भ क्रं.F.1-1/2006 (PS) Meeting दि.१९ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये नेट/सेट दोन वर्षात पुर्ण करण्याच्या अटीवर मान्यता दिलेल्या आहेत. परंतु या मान्येतेच्या यादीमधील ज्या शिक्षकांनी दि.०१.०१.१९९४ ते दि.११.०७.२००९ या कालावधीमध्ये एम.फिल अर्हता धारण केलेली आहे व एम.फिल अर्हता ग्राहय धरुन विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या शिक्षकांचे स्टेज २ ते स्टेज ५ कॅसचे प्रस्ताव महाविद्यालयाकडून मागवून घेऊन व त्यांची स्पेशल कॅम्प आयोजित करुन स्थाननिश्चितीबाबतची कार्यवाही करावी असा प्रशासनाने निर्णय घेतलेला आहे.

याबाबत आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, युजीसीने संदर्भ क्रं.F.1-1/2006 (PS) Meeting दि.१९ फेब्रुवारी २००८ (या कार्यालयाकडील आवक क्रं.7998 दि. २५ फेब्रुवारी २००८) च्या पत्रान्वये नेट/सेट दोन वर्षात पुर्ण करण्याच्या अटीवर मान्यता दिलेल्या आहेत. परंतु या यादीमधील ज्या शिक्षकांनी दि.०१.०१.१९९४ ते दि.११.०७.२००९ या कालावधीमध्ये एम.फिल अर्हता धारण केलेली आहे व एम.फिल अर्हता ग्राहय धरुन विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे अशा शिक्षकांनी मे महिन्याच्या १ ते १० तारखेपर्यंत प्रस्तावाचे विहीत शुल्क भरुन तसेच **युजीसीने संदर्भ क्रं.F.1-1/2006 (PS) Meeting दि.१९ फेब्रुवारी २००८ (या कार्यालयाकडील आवक क्रं.7998 दि. २५ फेब्रुवारी २००८) चे पत्र व त्यामधील संबंधीत शिक्षकांचे नाव असलेल्या पानाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.** तसेच स्थाननिश्चितीबाबतची सर्व आवश्यक ती कागदपत्रे जोडून प्रस्तावावर **M.Phil धारक शिक्षकांच्या स्थाननिश्चितीसाठी विशेष शिबीर** असा स्पष्ट उल्लेख करुन प्रस्ताव दि.१२ मे २०२३ पर्यंत सादर करावेत. प्राप्त प्रस्तावामधील प्रथम स्टेज २ व स्टेज ३ बाबतची स्थाननिश्चितीची कार्यवाही केली जाईल व त्यांनतर स्टेज ४ व स्टेज ५ बाबतची कार्यवाही केली जाईल.

सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे. सदरचे विशेष शिबीर आयोजना नंतर पुन्हा विशष शिबीर आयोजित करण्यात येणार नसल्याने त्याबाबतचे प्रस्ताव हे वेळेत सादर करण्याबाबतची तसेच प्रस्ताव विलंबाने प्राप्त झालेस व त्याबाबत स्थाननिश्चितीची कार्यवाही पुर्ण होऊ न शकलेस याबाबतची सर्व जबाबदारी ही संबंधित शिक्षक व प्राचार्य यांची राहिल याची नोंद घ्यावी. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर युजीसीचे संदर्भ क्रं. F.1-1/2006 (PS) Meeting दि.१९ फेब्रुवारी २००८ (या कार्यालयाकडील आवक क्रं.7998 दि. २५ फेब्रुवारी २००८) चे पत्र व शिक्षकांची यादी ठेवली आहे.

कळावे,

आपला विश्वासू

श्री. एम. पी. कदम
उपकुलसचिव
संलग्नता विभाग